दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा
● रविवार, दि. २१ डिसेंबर २०२५

# विद्यार्थ्यांनी रेडिओ क्षेत्रात करिअर करावे : आपटे

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांना रेडिओ क्षेत्रात करिअरसाठी अनेक संधी उपलब्ध आहेत. ए.एम.एफ.एम. चॅनेल, ऑल इंडिया रेडिओ, जाहिरात एजन्सी अशा विविध क्षेत्रात नोकऱ्या वाट पाहत आहेत. उत्तम रेडिओ जॉकी होणेसाठी विविध विषयांचा व्यासंग, चौफेर वाचन, भाषा व साहित्य, सांस्कृतिक या गोष्टींची जाण असणे आवश्यक आहे, असे मत रेडिओ जॉकी मनीष आपटे यांनी व्यक्त केले.

ते म्हणाले, स्वरुपानुसार उत्तम संहिता लेखन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. सर्व क्षेत्रांची माहिती असलेला विद्यार्थी उत्तम आर.जे. म्हणून करीअर करु शकतो. ज्या विद्यार्थ्यांना छान लिहिता वाचता येते त्यांना आर.जे. होण्याची संधी आहे,

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरच्या ज्युनियर आर्टस विभागाच्या वतीने नोकरी व करीअरच्या संधी या उपक्रमा अंतर्गत कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालयातील हॉलमध्ये केले होते. याप्रसंगी ते बोलत होते. स्वागत विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. प्रा.नयना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. एन. ढगे यांनी आभार मानले.